

# मनपाखरु

प्राजक्ता देशपांडे

# मनपाखरू

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मनपाखरू

## कथासंग्रह

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे

## मनमोही

ई साहित्य प्रतिष्ठान

# मनपाखरू (कथासंग्रह)

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे ( **मनमोही** )

मो. नं: 9960378297

e- mail id : deshpandeps97@gmail. com

insta account : the_soul_of_writer_

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary. dramatic. musical. sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ४ ऑक्टोबर २०१९ (नवरात्रि)

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



नमस्कार, हे माझं प्रकाशित झालेलं पहिलं वहिलं पुस्तक. कोणत्याही लेखकाला त्याच्या निर्मितीबद्दल अपार प्रेम असते आणि त्यातही आयुष्यात घडणाऱ्या पहिल्या गोष्टींचे अप्रुप भारी. माझ्या या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी मी ई- साहित्य टीमची खुप खुप आभारी आहे.

विद्वानांसाठी सोशल मिडिया म्हणजे ज्ञानाचं भांडार. इथे साहित्य कलेला जो वाव मिळत आहे तो खरंच आनंद देणारा आहे आणि यासाठी पाऊल उचलून माझ्यासारख्या लेखकाला कलागुण सादर करण्याचे डिजिटल व्यासपीठ मिळवुन देणाऱ्या ई साहित्य टीमचे कार्य कौतुकास्पद आहे.

आणि आता थोडं या पुस्तकाबद्दल, या कथांमधील नायक - नायिका काल्पनिक असले तरी आपल्यासारखेच सर्वसामान्य आहेत. पण तरीसुद्धा आजच्या जीवनशैलीनुसार त्यांचे वेळप्रसंगी संकटांना सामोरे जाणे, त्यांचे स्वभाव आणि त्यांची एकनिष्ठता त्यांना सगळयांपेक्षा वेगळा दर्जा देते आणि म्हणूनच ते नायक आणि नायिकेच्या रुपात आहेत.

तुमची उत्सुकता फार वेळ नाही ताणणार. पण आता माझी उत्सुकता वाढली आहे. वाचकांना माझ्या कथा कशा वाटतील बरं. तुम्हाला या कथा आवडतील अशी आशा करते. तुमचे बरेवाईट सर्व प्रकारचे अभिप्राय जाणून घ्यायला मी अतिशय उत्सुक आहे.

- मनमोही

या पुस्तकाच्या लेखिका प्राजक्ता संजयकुमार देशपांडे सिविल इंजीनियर पदवीधर आणि M. E. structure च्या विद्यार्थिनी आहेत. वाचन हा त्यांचा लहानपणापासूनचा छंद. त्यांच्या वडिलांकडून तो जणू वारसाहक्कानेच मिळालेला आणि नंतर लिखाणसुद्धा. त्यांचे वाचन अफ़ाट आहे. मोठंमोठ्या कादंबऱ्याही त्यांनी अगदी एका दिवसात वाचून पूर्ण केल्यात. सुहास शिरवळकर, शरदचंद्र वाळिम्बे, व. पु. काळे, सुधा मूर्ति असे वेगवेगळया धाटणीचे लेखक त्यांचे प्रेरणास्थान आहेत. आणि इंजीनियरिंगनेही त्यांना बरेच काही शिकवले असे म्हणायला हरकत नाही.

त्यांच्या कथेवर आपली मते वाचक त्यांना खालील पत्त्यांवर कळवू शकतात.

संपर्क :

प्राजक्ता संजयकुमार देशपांडे ( मनमोही )

मो. नं: 9960378297

e- mail id : deshpandeps97@gmail. com

insta account : the_soul_of_writer_

अर्पणपत्रिका

माझं पहिलं पुस्तक माझ्या सगळ्या सुख-दुःखामधे माझ्यासोबत असणाऱ्या माझ्या आई- वडिलांना आणि कुटुंबाला अर्पण.

स्वतःला लिखानाची आवड असताना देखील कामामुळे ती ज्यांना पूर्ण करता आली नाही तरी मला लिखानासाठी प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या बाबांना माझं पहिलं पुस्तक अर्पण.

तसेच वेळोवेळी माझी प्रशंसा करून माझे मनोबल वाढवणाऱ्या मित्र परिवाराला अर्पण.

🙏🙏🙏🙏

# मनपाखरू

या पुस्तकातील सर्व कथा, व्यक्ती, नावे, प्रसंग व स्थळे काल्पनिक असून त्यांचे कोणाही जीवित अथवा मृत व्यक्तींशी साम्य आढळून आल्यास तो केवळ योगायोग समजावा.

# कथानुक्रम

**कुटुंब**

**गुपित**

**नजरकैद**

**हमसफ़र**

# कुटुंब

नीलिमा आज विचारात होती... कितीही प्रयत्न केला तरी श्यामचे शब्द कानात घूमत होते... आज त्यांच्या नात्याला 3 वर्ष झाली, आजच्याच दिवशी श्यामने तिला आयुष्यभराच्या सोबतीचं वचन मागितलं होतं. श्याम नीलिमाच्याच वर्गात होता तो दिसायला अगदीच साधा होता पण त्याची हुशारी, त्याचं बोलणं, त्याचं प्रेमळ वागणं, सगळयांना आनंदी ठेवणं या गोष्टींमुळे तो समोरच्या व्यक्तिवर त्याची छाप पाडून जायचा. त्याचा आयुष्याकडे पाहण्याचा सुस्पष्ट दृष्टिकोन, त्याची जिद्द या गोष्टी नीलिमाला खुप आवड़ायच्या.

तिला नेहमी प्रश्न पडायचा की “कोणत्या गोष्टीमुळे ती श्याम कडे खेचली जाते?” ते दोघे खुप चांगले मित्र होते. कॉलेजमधे सगळया गोष्टींमधे दोघेच पुढाकार घ्यायचे. कधी हसत खेळत तर कधी रडत पडत.. पण जिंकायचं नेहमी दोघांमधलंच कोणी तरी...

सगळया कॉलेजला त्यांचा अभिमान होता. श्यामच्या आईला नीलिमा खुप आवडायची. ती श्यामची जोड़ीदार होण्यासाठी योग्य आहे असं त्यांना वाटे. दोघांच्या घरुन परवानगी घेऊन श्यामनी तिला लग्नासाठी विचारलं होतं आणि आपला सगळयात चांगला मित्र आपला जोड़ीदार होणार म्हणून नीलिमाही खुश होती पण दोघानी मिळून एक निर्णय घेतला. शिक्षण पूर्ण होईपर्यन्त आणि आपलं ध्येय गाठेपर्यन्त लग्न करायचं नाही. नीलिमाला माहित होतं, श्याम खुप ध्येयवादि आहे त्याला खुप मोठं बनायचं होतं कित्येकदा तो बोलताना स्वप्नात रंगून

आकाशात झेप घेण्याच्या गोष्टी करायचा. नीलिमासुद्धा खुप स्वाभिमानी होती तिने आपल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला होता म्हणून तर ती मन लावून शिकायची.

आज 3 वर्षांनी ते दोघेही शिक्षण पूर्ण करून पुढील गोष्टींसाठी सज्ज होते पण लग्नाबद्दल बोलताना तिला श्यामचे विचार ऐकून काही कळेनासं झालं कारण तो आता फ़क्त दोघांच्याच आयुष्यावर बोलत होता.

भारत सोडून अमेरिकेत स्थायिक होण्याचा विचार करत होता पण तिला फक्त श्यामच नाही तर त्याचं कुटुंबसुद्धा हवं होतं. लहानपणापासून तिला एकत्र कुटुंब खुप आवडायचं लहानपणापासूनचं तिचं ते स्वप्न होतं. श्यामच्या घरी पहिल्यांदा गेल्यावर तिच्यासाठी हीच गोष्ट जास्त आकर्षक होती की तो एकत्र कुटुंबात राहतो आणि आज त्याला हे सगळं सोडून दुसऱ्या देशात जायचं होतं सगळंच विचित्र चाललं होतं नीलिमाला कळत नव्हतं की हा तोच श्याम आहे का जो आपल्या कुटुंबावर एवढं प्रेम करायचा. नीलिमासाठी कुटुंब खुप महत्त्वाच होतं आणि त्याचं कारण तिच्या बालपणीच्या आठवणींमधे होतं...

चंद्रकांत देसाई म्हणजे सगळ्या गावासाठी नाना... गावातल्या लोकांसाठी एक आदराचं आणि विश्वासाचं स्थान. गावातल्या सगळ्या प्रश्नावर गावकरी देसाइन्च्या वाडयाकडे धाव घ्यायचे आणि त्यांनी दिलेल्या निर्णयाचा मानसुद्धा ठेवायचे. देसाई कुटुंब खुप मोठं होतं. चंद्रकांत देसाईना तीन मुलं होती, श्रीधर, किशोर आणि किरण. शिवाय त्यांना एक मुलगीसुद्धा होती, सुधा देसाई. कुटुंबामधे सगळे शिकलेले होते. शिक्षण पूर्ण झाल्यावर गावाच्या सेवेसाठी सगळयांनी गावातच एकत्र राहायचं हा नानांचा हट्ट. तसे संस्कारसुद्धा त्यांनी लहानपणापासून मुलांना दिले. सगळयात मोठा मुलगा श्रीधर याने शेतीमधे शिक्षण घेतले आणि गावातल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. किशोर शिक्षक होता गावातल्या मुलांना चांगलं शिक्षण मिळावं म्हणून तो मन लावून प्रयत्न करायचा या शिवाय संध्याकाळी शेतकऱ्यांनासुद्धा

शिकवायचा. त्यानंतरची सुधा, ती डॉक्टर झाली आरोग्याबद्दल गांवकऱ्यांना समजावून सांगणे अंधश्रद्धेला बळि न पड़ता विज्ञानाची मदत कशी घ्यायची ही सगळी कामे ती करायची. पुढे लग्नानंतर तिचा नवरा सुमित यानेही आनंदाने तिच्या कामात तिला मदत करायला सुरुवात केली किरण सगळयात लहान होता तसा त्याला इंजिनियर बनवून गावाचा कायापालट करायचं नानांचं स्वप्न होतं म्हणून नानांनी त्याला शिकायला परदेशात पाठवलं नीलिमा ही किशोरची मुलगी तिला लहानपणापासूनच किशोर आणि त्याची पत्नी सीमा यांनी नानांच्या आदर्शाप्रमाने वाढवलं

तिन्ही मुलांमधे किशोरचं नानांवर सगळयात जास्त प्रेम होतं. श्रीधरला शहराची ओढ़ होती पण नानांच्या भीतिमुळे तो गावातच राहिला पण किशोरच तसं नव्हतं तो पूर्ण मनानी गावाची सेवा करायचा. एकत्र कुटुंबात राहायची सीमाची पण खुप आवड होती आणि मनासारखं सासर मिळाल्यामुळे तिची पण काही तक्रार नसायची.

देसाई कुटुंबानी बरीच वर्ष गावाची सेवा केली. गावकऱ्याना जीवनावश्यक गोष्टींची सोय करून दिली. त्यांना मानाने आणि योग्य आयुष्य जगण्याचे मंत्र शिकवले. त्या नंतर किरण परदेशावरुन परतला तो एक चांगला इंजीनियर बनून. आता मात्र गावकऱ्यांची आशा अजून वाढली. आपलं गाव परिपूर्ण होणार आणि नानांच स्वप्न पूर्ण होणार म्हणून सगळी मंडळी खुश होती. गावात सारे काही होते, सुपिक जमीन, शिक्षण, पाणी, पण गावातल्या लोकांना राहायला पक्की घरं नव्हती जुनी दगडी बांधकामाची घरे आता पडिक झाली होती पण नविन घरे बांधायला शहरातला इंजीनियर आणि कंत्राटदार अवाजवी पैसे मागायचे पण आता तसे होणार नाही आता गावातच इंजीनियर आहे म्हणून सगळे खुश होते. पण नियतिला बहुधा हे मंजूर नव्हतं.

कोणातरी अमीर माणसाला गावामधे केमिकलचा कारखाना काढायची इच्छा होती. एवढ्या मोठ्या प्रश्नाचा निकाल साहजिकच देसाइंच्या वाड्यावर होणार. नानांनी सगळया गावकऱ्यांना बोलवुन घेतलं. मिश्रा नामक व्यक्तीला केमिकलचा कारखाना काढायचा होता

त्यासाठी गांवकऱ्यांनी आपली जमीन त्याला द्यायची आणि त्या बदल्यात तो सगळयांना काम आणि पैसे देणार असं त्याचं म्हणणं होतं. नानानी आपल्या तिन्ही मुलांना आणि लेक जावयाला पण बोलवलं. गावाच्या भल्याचा सगळयांनिच व्यवस्थित विचार करावा, उगाच अन्याय होउ नये हा उद्देश.

ठरल्याप्रमाणे सगळे आले. नानांनी पहिले मिश्राचं बोलणं ऐकून घ्यायचं आणि मग गावकऱ्यांशी चर्चा करुन निर्णय घ्यायचं असं ठरवलं मिश्रानी बोलणं सुरु केलं.

"नानासाहेब मेरे को फॅक्टरी डालनी है आपके गाव में सब लोगोंके मुताबिक आपके मर्जी बिना गाँव वाले मुझे उनकी जमीने नही देंगे तो आप हमारी मदद करो और इसके बदले हम आपको मुँह मांगी कीमत देंगे "

नाना म्हणाले " मिश्रा जी मला तुमची कीमत नकोय जर तुमच्या कारखान्यामुळे गावाची भलाई होणार असेल गावकऱ्यांना रोजगार मिळणार असेल तर माझी काहीच हरकत नाही उलट मीच तुम्हाला मदत करेन"

मिश्राला नवल वाटलं तो म्हणाला " आपके बारेमे जितना सूना था आप तो उससे भी अच्छे और ईमानदार निकले"

किशोरला हा माणूस आल्यापासून खटकत होता पण नानांच्या समोर तो गप्प होता आपलं मत नाना विचारणारच याची त्याला खात्री होती. नानांनी तिन्ही मुलांना आपलं मत विचारलं. श्रीधर आणि किरणला मिश्राच बोलणं पटलं त्यांना वाटत होतं की आता गावात राहून काही उपयोग नाही शहरीकरण होणं महत्वाचं आहे म्हणून त्यांनी आपली संमती दर्शवली. मुळातच त्या दोघांची ओढ शहराकडे होतीच. पण किशोर जरा समजदार होता कारखान्याचे दुष्परिणाम त्याला माहिती होते कारखान्यातून निघणाऱ्या दूषित पाण्यामुळे जमीनी उजाड़ होतील. शिवाय शेतकऱ्यांच काय??? जमीनी विकून कुठे जातील सगळया गोष्टींचा विचार करुन

मगच नानांनी निर्णय द्यावा असं त्यानं सुचवलं. नानांना त्याच म्हणणं पटलं आणि या बाबतीत त्यांनी मिश्राला विचारलं पण मिश्राने शेतकऱ्यांच्या जमीनी, घर, रोजगार या बाबत काही फारसा खुलासा नाही केला. शेवटी नाइलाजाने नानांनी त्याला नकार दिला.

किशोरच ऐकून नानांनी नकार दिला म्हणून श्रीधर आणि किरणला राग आला पण नानासमोर दोघे शांत बसले. त्या दिवसानंतर मात्र त्यांनी गावकऱ्यांना भड़कावने चालू केले. भोळे गावकरि त्यांच्या बोलण्याला फसले आणि नानाच्या समोर मंजूरी देण्यास तयार झाले. इकडे घरी श्रीधर आणि किरणच्या बायकांनी सीमाला त्रास द्यायला सुरुवात केली हे सगळं कशामुळे होतं आहे हे नाना आणि किशोरला कळत होतं पण त्यांचा नाइलाज होता. लोकांसोबत लढण्यासाठी ताक़त लागते पण आपल्याच लोकांसोबत, कुटुंबासोबत लढताना दोघेही हताश झाले होते. नानांचा निर्णय बदलण्यासाठीचे सगळे प्रयोग श्रीधर आणि किरणनी मिळून केले. एके दिवशी मात्र वादाचा कहर झाला आणि किशोरचा संयमाचा बांध तुटला आणि त्याने दोघांना खरी खोटी सुनावली पण गावकरी त्यांच्या सोबत होते म्हणून नानांना त्यांची साथ द्यावी लागली रागात येऊन किशोरने घर सोडायचा निर्णय घेतला. किशोरच्या बहिणीचं मत पण किशोर सारखच होतं ती पण त्याच्या सोबत निघाली किशोर आपल्या बहिनीला, बायकोला, मुलीला घेऊन निघाला.

सगळं समर्पित करुन, मन लाउन ज्याने गाव सजवलं त्याच्या भविष्याचे स्वप्न पाहिले त्याला गाव सोडून जाव लागलं. असं म्हणतात की जो दुसऱ्याचा विचार करतो त्याला खुप त्रास सहन करावा लागतो. देवपण सहज नाही मिळत. शेवटी जे व्हायचं तेच झालं किशोर गाव सोडून निघुन गेला.

श्रीधर आणि किरण बरोबरच गावालासुद्धा वाटलं की त्यांच्या रस्त्यातला मोठा काटा गेला आणि त्यांनी कारखान्याची सुरुवात केली. काही वर्षांनी नाना ही गेले गाव खऱ्या अर्थाने पोरक झालं. आता मात्र श्रीधर आणि किरणला रान मोकळ होतं. शेतकऱ्यांना फसवुन त्यांनी

जमीन स्वस्तात घेतली आणि आपली मनमानी चालू केली. त्यांचा वापर कामगारा सारखा केला. आता मात्र गावकऱ्यांना किशोरची आठवण झाली. त्याचे बोललेले शब्द आठवत होते पण आता खुप उशीर झाला होता.

किशोर त्याच्या कुटुंबासोबत शहरात राहायला आला. हुशार असल्यामुळे खुप लवकर यशाच्या पायऱ्या चढत गेला. या सुखाच्या रस्त्यामधे त्याच्यावर दुःख सहन करायची पण वेळ आली एका अपघातामधे त्याची बहिन आणि भाऊजी त्याची साथ सोडून गेले पण तो खचला नाही सीमाची साथ आणि छोटया निलिमाच्या खेळकर हट्टानसोबत तो शिखर गाठत गेला. आज तो शहरातल्या प्रतिष्टित व्यक्तींपैकी होता सीमा आणि किशोरनी नीलिमाच्या पालन पोषणामधे काहीही कमी ठेवली नाही. मुळातच नीलिमा एक हुशार आणि सुंदर मुलगी होती त्यात तिला मिळणाऱ्या संस्कारामुळे आणि तिच्या विनम्र स्वभावामुळे तिच्या चेहऱ्यावर एक वेगळंच तेज होतं. बघताक्षणी ती कोणालाही मोहित करत असे. तिच्या बोलण्याने ती सगळयांना आपलेसे करत असे हळू हळू ती मोठी होतं होती तसं किशोर आणि सीमानी निर्णय घेतला तिला तिच्या मनाप्रमाने जगण्याचे स्वातंत्र्य द्यायचे. मुलगी म्हणून कोणत्याही बंधनात जखडून नाही ठेवायचं. एकुलती एक म्हणून तिला फ़क्त जपायचंच नाही तर समाजात सन्मानाने जगायला शिकवायचं आणि वेळप्रसंगी कठीण होऊन लढायला ही. दोघांनीही तिला वाढवताना तिला तिच्या कुटुंबाची जाणीव सतत करून दिली. तिच्या लहानपणीच्या आठवणी हमेशा ताज्या ठेवल्या आपल्याला पण मोठं कुटुंब, गाँव आहे ही जाणीव तिला दिली या बाबतीत किशोर आणि सीमानी खुप मोठं मन दाखवलं.

नीलिमाही गाव सोडलं तेव्हा कळती होती. त्यामुळे गावातल्या तिच्या आठवणीही ताज्या होत्या. त्याला ख़त पाणी देऊन तिच्या आई वडिलांनी त्याची जपणूक केली या सर्व गोष्टींमुळे निलिमाच्या मनामधे एकत्र कुटुंबाबद्दलची ओढ खुप जास्त होती.

श्यामसोबत असताना त्याच्या घरी जाता येता तर ही ओढ अजूनच वाढली कुटुंबाचा खरा अर्थ कळाला. आपण काही तरी गमावलं हे तिला लहानपणी कळत होतं पण नेमकं काय ते तिला श्यामच्या कुटुंबाला पाहून कळलं आणि आज अशा कुटुंबाला सोडून श्याम फ़क्त दोघंच अमेरिकेत स्थायिक होण्याचा विचार करत होता त्याच्या मते त्याच्या बुद्धिला चालना देणारे काम इथे नाही. त्याच्या योग्यतेची कदर इथे नाही आणि भारताबाहेर त्याला ते सर्व करणे शक्य होते जे जे त्याला करायचे आहे. थोडक्यात काय तर सगळया बंधनांतून त्याला सुटायचे होते.

नीलिमासमोर आता खुप मोठा प्रश्न होता. श्यामच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन त्याच्यासोबत जायचे की लहानपणापासून बाबानी शिकवलेल्या देशप्रेमाची आठवण ठेऊन श्यामचे मन वळवण्याचा प्रयत्न करायचा निलिमाला चांगलंच माहित होतं की श्यामने घेतलेला निर्णय बदलन हे अशक्यच आहे. त्याच्या याच धैर्य आणि जिद्दी वर तर ती भाळली होती. पण तिला त्याचा आज त्रास होईल असं वाटलं नव्हतं. वास्तविक पाहता हा काही फार मोठा प्रश्न नव्हता काही वर्षांचा प्रश्न असता तर ती तयार पण झाली असती पण श्यामनी 'कायमच' असा निर्णय सांगितल्यामुळे तिचा गोंधळ उडाला होता पण तिलाही निर्णय घेणे आवश्यक होते आणि तोही योग्य.

नीलिमानी निर्णय घेतला होता आणि तिने आता मागे वळून न पाहण्याचा निश्चयसुद्धा केला होता. तिने श्यामला शेवटचं आणि ठाम सांगीतलं- ती परदेशात येईल ते फ़क्त एका अटिवर. परदेशात फ़क्त पाच वर्षच राहायचं एवढा काळ त्याच्यासाठी अनुभव गाठिला बांधायला पुरेसा होता. श्यामनी खुप विचार करून चार दिवसांनी होकार कळवला.

आता दोघांच्या लग्नाला फक्त 3 महीनेच बाकी होते सगळी तयारी झाली होती लग्नाच्या दुसऱ्या रात्रीच ते अमेरिकेला निघणार होते ठरल्याप्रमाणे दोघांचं लग्न एकदम थाटात झालं कोणाचीही सहज नजर लागेल अशीच जोड़ी होती सगळे कार्यक्रम पार पाडून ते अमेरिकेला गेले.

अमेरिकेत दोघांचा संसार नव्याने चालू झाला. नवे नवे संघर्ष समोर येत होते तसा श्याम अजूनच जोराने काम करायचा समोर येईल ते वादळ पार करून किनारा गठायची जणू त्याला घाई झाली होती. नीलिमाला ही यश मिळत होतं आणि बघता बघता त्यांना 1 वर्ष पूर्ण झालं. या एक वर्षात त्यांनी भरपूर यश, पैसा, गाड़ी, बंगला, प्रतिष्ठा मिळवली आणि त्याच सोबत त्यांना एक सुंदर मुलगी 'माला'सुद्धा झाली. आयुष्याकडून असलेल्या सर्व इच्छा नीलिमाच्या पूर्ण झाल्या. किती तरी भाग्यवान असल्याची तिला आता जाणीव होती. आता नोकरी सोडून ती फक्त मालासोबत राहु लागली आणि श्याम जसा जसा यशाच्या पायऱ्या चढत गेला तसा घरच्या पायऱ्याही विसरत गेला पण नीलिमा समजदार होती. कामाचा व्याप, त्याला असलेली कामाची ओढ तिला माहित होती म्हणूनच ती कधी तक्रार नाही करायची.

पण मागे सारलेल्या वादळाला पाहताना तिला समोर येणारा त्सुनामी दिसलाच नाही

5 वर्षांनंतर श्यामने भारतात परतायला नकार दिला त्याचे इथले मित्र मैत्रिणी कंपनी सर्व काही सोडून भारतात परतने त्याला मान्य नव्हते, इथल्या लोकांमधे तो गुंतून गेला होता आणि आपले संस्कारही विसरत चालला होता. त्याचं हे बिनधास्त आणि बेजबाबदार वागणं निलिमाला खटकायचं आणि असे संस्कार तिला माला वर होउ द्यायचे नव्हते. तिच्या मधली आई तिला क्षणोक्षणी मायदेशी परतण्याचे सल्ले द्यायची मग मात्र नीलिमाने ठामपणे भारतात जायचंच असं सांगितलं. पण श्यामची नकारघंटा चालूच होती. तीने त्याचं मन बदलण्याचा खुप प्रयत्न केला पण सगळं व्यर्थ गेल. मग मात्र नीलिमा मालाला घेऊन एकटीच भारतात परतलि.

काही दिवसानंतर कुटुंबाच्या ओढीने तो परत येईल असे निलिमाला वाटले होते पण त्यानंतर श्यामने तिची विचारपुससुद्धा नाही केली.

तो त्याच्याच यशामधे एवढा गुरफटला होता की भूतकाळामधे जाणे त्याला जणू अशक्य झाले होते. नीलिमा आणि मालाला विसरायला त्याला फार अवधी नाही लागला एवढ्या वर्षांची साथ आणि प्रेम तो सहजासहजी विसरून गेला.

त्याच्याच कंपनीमधे त्याच्या बॉसच्या मुलीसोबत त्याने लग्न केले. कैथरीन तशी स्वभावाने खुप छान होती पण लहानपणापासूनच तिचा हट्टी स्वभाव होता. समजून घेणे किंवा एखाद्यासाठी त्याग करणे तिच्या पचनी न पडणारे होते. तिच्या सोबत संसार करताना मात्र आता श्यामची तारांबळ उडत होती. आजपर्यंत त्याला काही समजून घ्यायची गरजच पडली नव्हती किंबहुना समजून सांगायचीही गरज नव्हती, नीलिमा होतीच तशी. पण आता तसं नव्हतं त्याला सगळं समजून घ्याव लागत होतं. त्याला पडती बाजू घ्यावी लागत होती आणि म्हणूनच त्याला नीलिमा क्षणाक्षणाला आठवत होती.

काही वर्षांनी अचानक घरच्यांची आठवण आली म्हणून त्याने घरी फोन केला पण कोणी उचलला नाही मग त्याने शेजारी फ़ोन केला तेव्हा कळले त्याचे वडील खुप आजारी आहेत आणि घरचे सगळे दवाखान्यात आहेत तसा तो तडक रजा घेऊन घरी आला पण तोपर्यंत खुप उशीर झालेला होता 10 वर्षांचा काळ लोटला होता आणि त्याने एकदासुद्धा घरच्यांची विचारपुस केली नव्हती. त्याचे वडील आता हयात नव्हते हे दुःख पचवतानाच त्याला आणखी एक धक्का बसला. त्याने घरामधे नीलिमाला वावरताना पाहिलं. नीलिमा अमेरिकेहून परत आली ती श्यामच्या घरी. तिने त्याचं घर सांभाळलं, त्याच्या आई वडील आणि कुटुंबाला आपलं समजून त्यांची काळजी घेतली. मालालाही वाढवलं आणि कुटुंबाचं प्रेम पण दिल. त्याला आता हे सगळं ऐकून स्वताःची लाज वाटत होती. किमान एकदा तिची विचारपुस तरी करायला हवी होती.

आज त्याला खुप अपराधी असल्यासारख वाटत होतं. तिच्यासमोर थांबायचीही त्याच्या मनाची हिम्मत होतं नव्हती. त्याला वाटलं होतं निलिमाने तिचं आयुष्य तिच्या मनाप्रमाणे घालवलं असेल. नविन सुरुवात केली असेल आपण जसे तिच्यासाठी थांबलो नाही तसे तिही थांबली नसेलच पण निलिमाचं श्याम नी न सांगतासुद्धा त्याची वाट पाहण त्याला अपराधीपण देऊन गेलं आणि त्याला माफ़ी मागून त्याच्या मनावरचं ओझ कमी करायचं होतं म्हणून त्याने हिम्मत एकवटून तिला बोलायचं ठरवलं.

पण त्याला अजूनच अपराधी वाटायला लागलं कारण नीलिमाला अमेरिकेत घडलेल्या सगळया घटना माहित होत्या. कैथरीन सोबत त्याचं झालेल लग्नसुद्धा. पण तरीसुद्धा तिने त्याचं घर सांभाळलं. त्याला काही केल्या या सगळयांची उत्तरे मिळेना.

नीलिमानी त्याच्या डोळयातल्या प्रश्नांना ओळखून तिच्या भावना सांगितल्या

" श्याम, मी तुझ्यावर प्रेम केलं होतं. तू होता तसाच मला आवडायचा. त्यात मला बदल नको होता. तुझा जिद्दीपणासुद्धा मला आवडायचा आणि तुझ्यासोबत लग्नाचं वचन घेतलं ते काही माझ्यासाठी खेळ नव्हता. तुझ्यासकट तुझी माणसंसुद्धा माझीच झाली असं मी समजते. त्यांनीसुद्धा मला भरपूर प्रेम दिल. प्रेमात फ़क्त साथच नाही तर जोड़ीदाराचा आनंदसुद्धा बघतात. तू आनंदी होतास म्हणून आम्हीसुद्धा इकडे आनंदी होतो. तुझी कर्तव्य तू पार पाडायला हवी होतिस पण तू तुझ्या यशामधे आणि अहम्मधे एवढा गुरफटून गेला होतास की तुला तुझ्या मागे उभे असलेले, तुझ्यावर प्रेम करणारी तुझी आपली माणसं पण नाही दिसली. जे झालं ते झालं. मी माझं कर्तव्य आणि वचनं पूर्ण करत होते आणि त्याबद्दल मला तुझ्याकडून मोठेपणा मिळेल अशी कधीच अपेक्षा नव्हती. फक्त आश्चर्य वाटत की आपलं प्रेम, एवढ्या वर्षांच्या आठवणी तू सहज विसरलास. आणि मी मात्र नेहमीच तुझ्या फ़ोनची वाट पाहत होते. पण कैथरीन सोबत तुझ्या लग्नाची बातमी ऐकली आणि मग मात्र मला लक्षात आलं की तू माझ्या आणि माला पासून कायमचा दुरावला आहेस. एवढ्या वर्षांनी तुझ्या चुकांचं पारायण तुला ऐकवण्याची माझी मुळीच

इच्छा नाही. पण एक वडील म्हणून तुझ्या कर्तव्यांची जाणीव मी तुला करून नाही दिली तर माझ्यातली आई मला कधीच माफ़ नाही करणार. बाकी तुझ्याबद्दल आम्हाला कोणालाच आता तक्रार नाही त्यामुळे तू निश्चिन्त राहा जिथे कुठे राहशील खुश रहा "

श्यामला आता गहिवरुन आल तुझी साथ कधीही सोडणार नाही हे वचन नीलिमाने पाळलं होतं मागे राहिला होता तो श्याम स्वतःच्या मनाप्रमाने वागूनसुद्धा अजूनही दुःखी पण या उलट नीलिमा. दुसऱ्यासाठी, प्रेमाखातर दिलेल्या वचनाला जागून आज ती सुखाची झोप घेऊ शकते कारण तिच्याकडून तिने सर्व नात्यांना योग्य तो सन्मान दिला होता आणि तिच्या मनात कसलीहि खंत नव्हती होतं ते फ़क्त प्रेम, काळजी आणि निर्मळ समाधान...

# गुपित

शेखर आज नेहमीप्रमाणे घाईघाईमधेच निघाला. वेळेवर घरातून निघणे त्याला कधीच जमत नाही. म्हणून त्याची स्वतःवरच चीड़ चीड़ होतं होती. मुग्धाच असं नव्हतं, ती वेळेवर सगळं तयार ठेवायची. एक बायको, सुन, आई म्हणून ती सगळीकडे तत्परतेने लक्ष द्यायची. तिची ही सवय शेखरला नेहमीच तिच्याकडे आकर्षित करायची. लग्न होऊन 12 वर्षे झाली आणि एका मुलानंतरही तिच्याबद्दलची ही ओढ त्याला कौतुकास्पद वाटे. आज मीटिंगच्या दिवशीही आपण रोजच्यासारखाच उशीर करतो या वर त्याची चीड़ चीड़ आणखीच वाढली.

कसा बसा तो मीटिंगला पोचला आणि मीटिंग संपवली आजच्या मीटिंगच्या संदर्भामधल्या काही गोष्टी मार्गी लावण्यासाठी त्याला उदयाची कॉन्फेरेंस अटेंड करणे गरजेचे होते आणि त्यासाठी त्याला लवकर निघाव लागेल असा विचार करुन त्याने फोन वरूनच मुग्धाला तशी कल्पना दिली आणि तो बॅग घेऊन निघाला, तेव्हा संध्याकाळ झाली होती.

पुणे इंदौर अंतर तो रात्रितून पूर्ण करणार नव्हताच आणि कॉन्फरेंसही 4 वाजता होती म्हणून तो वाटेमधे विश्रांती घेऊन मग सकाळी पोचणार होता. शिवाय मुग्धाने काही गोष्टींची लिस्ट दिली होती आणि तिच्या भावाला देण्यासाठी काही वस्तु आणि मग तो कॉन्फरेंस नंतर लगेच निघणार होता परतीच्या प्रवासाला... पण एकट्याने जायचे म्हणजे फार अवघड काम.. कंटाळवाणा प्रवास.. कुठल्याश्या विचारात त्याने प्रवासाला सुरुवात केली आणि तो गावाबाहेर पडला.

निशिची परीक्षा नसती तर मुग्धाही आली असती तेवढाच दोघांना क्वालिटी टाइम. ह्या मुलांच्या परीक्षा म्हणजे आई वडिलांना ताप. त्यांचा अभ्यास घ्या, तब्येतिची काळजी घ्या,

खाण्यापिण्याचे लाड सांभाळा पण तरी निशि खुप शांत आणि समंजस मुलगा होता. त्याच्या जन्माच्या आधी मुग्धाला शेखर रोज एक निशिगंधाचं फूल द्यायचा.

मुग्धा रोज म्हणायची, "काय रे शेखर, अंगणातूनच तू मला रोज हे फूल देतोस कधी तरी बाहेर जायचे कष्ट घे"

आणि हसून तो तिला म्हणायचा

"एक दिवस आपलं फूल पण इथेच खेळेल म्हणून इथलंच फूल देतो"

त्यांच्या या गोड क्षणांची आठवण म्हणून मुग्धाने बाळाचं नाव निशिकांत ठेवलं. विचार करत करत तो बराच दूर आला होता आणि आता हळू हळू त्याला झोप खुणावत होती तसा त्याने इथेच जवळपास स्टे करायचा निर्णय घेतला त्याला एका बोर्डवर ठीकरी असं काहीसं अंधुक झालेलं नाव दिसलं. गाव तसं छोटंच होतं. पण त्याला गावाबाहेर रोडवरच एक लॉज मिळाला. सुनसान जागेवरती असं थांबणं त्याला काही बरोबर वाटत नव्हतं पण त्याला आता झोपेसमोर काही दिसण्याची शक्यताच नव्हती. तसा तो तड़क रेसेप्शनवर गेला आणि रूम बुक केली.

दिवसभराचा थकवा जाणवत होता म्हणून त्याने रेसेप्शनला फ़ोन करुन चहा पाठवयला सांगितले. रेसेप्शन वरच्या बंटीने सांगितले,

" एवढ्या रात्री चहा मिळणार नाही साहेब, इथे गावाबाहेर आहे हे हॉटेल, आणि रात्री शक्यतो लोक चहा नाही मागवत!"

त्याच्या बोलण्यातला भावार्थ समजून त्याने जे असेल ते पाठवायला सांगितले.

दाराची बेल वाजली रूम सर्विस असेल म्हणून त्याने दार उघडले तर समोर जेमतेम 25 -30 वयोगटातील एक तरुणी बाहेर उभी होती. तिने सिल्वर रंगाची साडी, त्याच रंगाच्या मैचिंग बांगड्या, पायात हिल्स, भड़क लाल रंगाची लिपस्टिक, आयलाइनर असा पार्टी वेअर मेकअप केला होता. तिच्याकड़े पाहून ती थेट पार्टी मधूनच आली होती असं वाटत होतं. पण एवढ्या रात्री तिचं असं एकटिने शेखरच्या रूम बाहेर असण्याचं काही कारण नव्हतं शेखरने विचारलं

" येस मे आय हेल्प यू ?" आणि तेवढ्यात रूम सर्विस वाला आणि रिसेप्शन वरचा बंटी दोघेही तिथे आले त्याने तिचं तिथे असण्याचं स्पष्टीकरण दिलं

" सॉरी सर तुम्हाला डिस्टर्ब करतोय पण एकही रूम रिकामि नाहिये आणि या मॅडमला नाही म्हणणे पण योग्य नव्हते म्हणून तुमच्या परमिशनसाठी आलो आहोतं "

" कसली परमिशन हवीये?" शेखरने विचारलं

" सर प्लीज तुम्ही यांना तुमच्या रूममधे स्टे करू दिलात तर बरं होईल "

शेखरला काय उत्तर द्यावे ते कळत नव्हतं पण त्या मुलीच्या गेटअप वरुन तरी ती चांगल्या घरातली वाटत होती पण मग तिचं एवढ्या रात्री भटकन त्याला खटकत होतं. परिस्थितिचा अंदाज घेता त्याला नाइलाजाने होकार द्यावा लागला. रूम सर्विस वाला आभार मानून निघुन गेला. आता रूममधे दोघेच उरले. सोबतीला भयाण शांतता. अश्या शांततेचा भंग करत त्या मुलीने सांगितलं,

"माझं नाव पूर्वी, तुम्ही ज्या प्रश्नार्थक नजरेने पाहत होता ते मला कळत होतं आणि साहजिकच आहे एवढ्या रात्री मी अशी एकटी. कुणालाही प्रश्न पडतीलच, मी माझ्या नवऱ्या सोबत इथे एका पार्टीला आले होते. पार्टीमधे त्याच्या मित्रांसोबत त्याला थोड़ी जास्तच चढली आणि येताना गाड़ीमधे आमच्यात थोड़े वाद झाले आणि तो मला इथेच काही अंतरावर सोडून

गेला पण मला सवय आहे तो रागात असंच करतो म्हणून मी फ़ोनमधे लोकेशन पाहून इथे स्टे करायला आले सकाळी तो शुद्धिवर आला की येईल मला शोधत "

शेखरला काय बोलावे ते कळेना ही बाई इतकी शांतपणे हे असं सगळं सांगूच कशी शकते, सांगताना तिच्या चेहऱ्यावरचे भाव तसुभरही नाही बदलले याचा अर्थ असा प्रसंग तिने खुप वेळेस अनुभवला आहे. जाउदे आपल्याला त्याचे काय असा विचार करून तो झोपण्यासाठी वळला रूममधे 2 बेड होते ते पाहून त्याला हायसे वाटले आणि तो एका बेडवर जाऊन झोपला.

झोपताना त्याने पूर्वीला सांगितलं " हे पहा, मला सकाळी लवकर इंदौरला निघायचे आहे, तुम्हाला काही मदत लागली तर कळवा आणि हो निश्चिन्त मनाने झोपा, तुम्ही सुरक्षित आहात. "

सकाळी त्याला 6 वाजता निघायचे होते तसा त्याने गजर लावून ठेवला पण त्याला काही केल्या झोप येत नव्हती. रूममधे अशी अनोळखी स्त्री असताना झोप कशी येईल ? म्हणून तो या कुशीवरुन त्या कुशीवर करत होता थोड्या वेळात त्याला आपल्या जवळ कोणी तरी आहे असा भास झाला. पण तो झोपेत असल्याचं नाटक करुन तसाच पडून राहिला आणि त्याला आपसुकच झोप लागली.

सकाळी गजर वाजला तेव्हा त्याने पाहिलं रूममधे कोणीच नव्हतं एवढ्या सकाळी ती मुलगी कुठे गेली आणि रात्री ती माझ्या जवळ कोणत्या हेतुने आली असेल? नकळत त्याच्या डोक्यात कसले तरी विचार येऊन गेले आणि मुग्धाचा विचार करून त्याच्या अंगावर अनामिक भीतीने काटा आला.

इंदौरला जायला उशीर होईल म्हणून त्याने बाकी सगळे विचार बाजूला ठेऊन दिले आणि तो निघाला ठरल्याप्रमाणे सगळी कामे करून तो परत पुण्याला घरी आला रात्रीच्या

जेवणानंतर थोडा वेळ तो निवांत बातम्या पाहण्यासाठी बसला काही ठराविक हवामानाच्या बातम्यानंतर आजची ब्रेकिंग न्यूज़ होती,

" इंदौर जवळ एका अज्ञात स्त्रीचा मृतदेह सापडला"

ओळख पटवण्यासाठी त्यांनी त्या मृतदेहाचे फ़ोटो दाखवले होते. कालच जिवंत आणि चालत्याबोलत्या पूर्वीला भेटलेल्या शेखरने तिला लगेच ओळखले. आणि तसा तो आणखीच डिस्टर्ब झाला. काल रात्री घडलेले सगळे प्रसंग त्याच्या डोळयासमोरून गेले.

कोण होती ती पूर्वी?? नक्की कोणाची बायको होती ती??? तिच्या म्हणण्यानुसार तिचा नवरा शोधत आला असेल का तिला?? का त्यानेच तिला मारलं असेल??? आणि मग पोलिसांनी त्या लॉजबद्दल काहीच कसा उल्लेख केला नसेल???पोलिसांना कळेल की कालची रात्र ती माझ्या सोबत होती?? पोलिस घरी चौकशीला आले तर मुग्धाला काय सांगणार?? एक रात्र कोण्या परक्यास्त्री सोबत अनोळखी ठिकाणी मी राहिलेलं ती समजून घेईल????

असे अनेक प्रश्न शेखरला पडत होते आणि प्रत्येक प्रश्नाबरोबर त्याची झोप त्याच्या पासून दूर जात होती.

दुसऱ्या दिवशी त्याचे डोळे स्पष्ट सांगत होते की त्यानी आक्खी रात्र जागून काढली आहे. तो रोजच्यापेक्षा काही तरी वेगळाच दिसत होता, थोडासा विचारात मग्न असा. त्याचे कशातच लक्ष नव्हते म्हणून मुग्धाने त्याला तब्येत, काम आणि बाकी कसली काळजी नाही ना याबद्दल विचारपुस केली पण तिच्या नजरेला नजर मिळवण्याची हिम्मत तो करू शकला नाही आणि माझं थोड़ डोक दुखत आहे असं म्हणून तो निघुन गेला.

घरातून बाहेर निघताना तो ऑफिससाठीच निघाला होता पण आता मात्र तो तिकडे जाणार नव्हता. ती पूर्वी कोण होती? तिचा अचानक मृत्यु कसा झाला? तो अपघात होता की

घातपात या सगळया प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय तो आज घरी जाणार नव्हता. साधं सरळ आयुष्य जगत असताना नको त्या भानगडी मागे लागतात काय पण नशीब असतं एकेकाचं. असा विचार करून त्यानी डायरी काढली आणि दिवसभराचा कार्यक्रम आखला सगळयात आधी तो त्या लॉज वरती फ़ोन करणार होता निश्चितच तिच्याबद्दल शेखरच्या हाती काही तरी तिथे मिळणार होतं, त्यानंतर तो तिची चौकशी करणार होता आणि अगदीच गरज पडली तर पोलिसातही जाणार होता आणि अचानक त्याला आठवलं त्यांच्या घरी कधी कधी पोळया करायला येणाऱ्या मावशीचा भाऊ पण पोलिसात आहे गरज असेल तर त्याची मदत घ्यायला काहीच हरकत नाही.

ठरवल्याप्रमाणे त्याने मोबाईल काढला आणि त्याच्या जवळ असलेल्या कार्ड वरुन त्याने लॉजला फ़ोन लावला

दोनच दिवस होऊन गेले होते त्यामुळे रिसेप्शनवरील बंटीने लगेचच ओळख दाखवली आणि त्याच्याजवळ पूर्वीबद्दल असलेली माहिती दिली.

पूर्वीने तिच्या घराचा पत्ता नव्हता सांगितला आणि तिच्याकडे पर्स आणि डाक्यूमेंट्स पण नव्हते पण एकंदर तिचा बोलका स्वभाव असल्यामुळे जी कथा तिने शेखरला सांगितली तीच कथा थोड्या जास्त डिटेल्स नी त्या रिसेप्शन वर सांगितली होती त्यावरुन त्या बंटीने तिच्या मैत्रिणीचा पत्ता दिला.. कोरेगाव पार्कमधे तिची मैत्रीण राहाते, नीता तिचं नाव. निताच्या लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी अटेंड करायला हे नवरा बायको आले होते. निताच्या नवऱ्याचं रेस्टोरंट आहे तिथे, आणि तिथेच पार्टी होती.

काय बर नाव त्या रेस्टोरंटच, हाँ रेनबो. शेखरने मैप वरती लोकेशन सेट केलं आणि तो निघाला 1 तासानंतर तो रेनबो असे लिहिलेल्या रेस्टोरंटच्या समोर उभा होता. कार व्यवस्थित पार्क करून तो रेस्टोरंटच्या आत शिरला. पाणी वगेरे पिल्यानंतर त्याने वेटरला सांगितलं की त्याला मालकाला भेटायचं आहे वेटरने सांगितलं " 2 दिवसा पासून मालक सुट्टीवर

आहेत त्यांचा भाचा सध्या काउंटर सांभाळतो तुम्हाला काही विचारपुस करायची असेल तर तुम्ही तिथे करू शकता.

" छे !!! भाच्याला काय विचारणार?? नीताचा नवरा भेटला असता तर बरं झालं असतं, बघू तरी चौकशी करू " असा विचार करून तो काउंटर कडे निघाला. काउंटर वर जेमतेम पंचविशितला तरुण बसला होता. थोडीफार जुजबी चर्चा करून त्याने मालकाबद्दल चौकशी केली. आधी तो तरुण निताच्या नवऱ्याबद्दल काही सांगायला तयार नव्हता पण शेखरने त्याचं नेटवर्क आणि ओळखी वापरून शेवटी पत्ता काढलाच. आणि मग तो नीताच्या नवऱ्याला म्हणजेच अनिलला भेटायला निघाला.

अनिल लोणावळयाला एका लॉज वर होता. तो का असा लपून बसला असेल? त्याचा आणि पूर्वीच्या खुनाचा काही संबंध तर नसेल? पण काही असो अनिलला काही तरी नक्कीच माहिती होते आणि म्हणूनच तो कोणालाही न सांगता असा एकटाच लोणावळयाला लपून होता. विचार करत करत तो अनिल जिथे होता त्या ठिकाणी पोचला.

अनिल इथे नाव बदलून सुधीर या नावाने राहत असल्याचे त्याला रेस्टोरंटवरुनच भाच्याकडून कळले होते. त्यामुळे रूम नंबर मिळणे त्याला सहज सोपे होते पण खरी कसरत होती ती अनिलकडून सगळं वदवून घेण्यात आणि त्याला एक कल्पना सुचली. तो सूट बूटमधे होताच त्याने त्याच्या बैग मधून त्याचा ID काढला आणि तो मुद्दामच उल्टा घातला जेणेकरुन तो कोणाला दिसणार नाही. आणि रिसेप्शन वरून रूम नंबर घेऊन त्याने अनिलच्या दाराची बेल वाजवली.

अनिलने दरवाजा उघडला आणि शेखरने तो क्राइम ब्रांच मधून आला आहे असं सांगत त्याचा ID दाखवला. मुळातच क्राइम ब्रांचचं नाव ऐकून घाबरलेल्या अनिलने हातापाया पडायला सुरुवात केली आणि माझा काही संबंध नाही सर हे काम नीताचं आहे असं सांगितलं. पुर्वीचा खून झाला हे त्याला टीवी वरुन समजलंच असेल, तर आता शेखरची कल्पना काम करत होती. अनिलकडून त्याला हवी असलेली माहिती मिळत होती.

"साहेब मी सगळं सांगतो अगदी आधीपासूनच सांगतो पण मला वाचवा साहेब माझ्या जीवाला धोका आहे. "

अनिलने सांगायला सुरुवात केली, " मी, नीता, पुर्वी आणि राजेश म्हणजे पुर्वीचा नवरा, चौघेही कॉलेज पासूनचे मित्र मैत्रिणी. कॉलेजमधे पुर्वी ब्यूटी कॉन्टेस्टमधे फर्स्ट तर नीता दुसरी आली होती. आणि तिथेच मला आणि राजेशला या दोघी आवडल्या आणि आम्ही त्यांना मागणी घातली. आम्ही दोघेही कॉलेजमधे बड्या बापचे राजकुमार म्हणून फेमस होतो आणि या दोघींनीही आम्हाला होकार दिला.

राजेश मूळचा इंदौरचा तो तिकडे सेटल झाला. माझी होटेल्सची चेन होती पुण्यात म्हणून आम्ही इथेच सेटल झालो. लग्नानंतर मला हळू हळू समजायला लागलं की नीताला माझ्यापेक्षा माझ्या पैशांवर जास्त प्रेम आहे आणि तिला कॉलेज पासूनच राजेश आवडतो. तिचा स्वभावच थोडासा फ्लर्टी होता म्हणून मला इतक्या वर्षात कधी काही कळलं नाही. नीता सांगताना तर पूर्वीला तिची जवळची मैत्रीण म्हणे पण वास्तवात ती आतून तिच्याबद्दल नेहमी कूट खाऊन असे. एक तर पूर्वी दिसायला नीतापेक्षा उजवी होती आणि त्यात राजेशची पसंत आणि पूर्वी मनानेही खुप सुरेख होती त्यामुळे कॉलेजमधेही सगळे तिच्या भोवतीच असायचे यामुळे साहजिक निताच्या मनात तिच्याबद्दल तेढ होता.

आधी आम्हाला वाटलं की राजेश आणि नीतामधे लग्नानंतर खुपच घट्ट मैत्री झालिये पण नंतर मात्र मला आणि पुर्वीला संशय येत होता. ते दोघे आम्हाला फसवत होते चालु स्वभावाच्या नीताने शेवटी राजेशला आपल्या जाळयात ओढलंच होतं आणि मग आम्ही एकमेकांना सतर्क करायचो आणि ह्यांची उलटतपासणी करायचो तर या दोघांची उत्तरे परिस्थितीला विसंगत आणि न पटणारी होती असं आम्हाला वाटत होतं आणि त्या दिवशी पार्टीमधे तर पुर्वीने त्यांना रंगेहाथ एकमेकांसोबत पकडलं पण राजेश शुद्धित नसल्यामुळे पूर्वीने राजेशला रागारागात ओढून नेल, राजेश मुळात चांगला होता फक्त थोडा भरकटला होता म्हणून

पूर्वी शांत होती, ती त्याला समजावून सांगणार होती पण नीताच्या डोळयासमोरून पूर्वीने राजेशला ओढून नेलेलं नीताला सहन झालं नाही, तिचा ईगो दुखावला आणि नंतर तिने कोणाला तरी फ़ोन केलेला मी चोरून ऐकला. फ़ोन वर ती सांगत होती की काटा बाजूला काढायची हीच ती वेळ.

मला खुप भीती वाटली नेमका ती कोणाबद्दल बोलत होती हे समजायला मला फारसा वेळ लागला नाही. निश्चितच पुर्वीच्या जीवाला धोका होता म्हणून मी तिला मेसेज केला पण त्या रात्री माझ्या वरसुद्धा हल्ला झाला आणि माझ्या लक्षात आलं की एका दगडात दोन पक्षी मारण्याचा नीताचा विचार होता आणि म्हणून मी इकडे पळून आलो. मी तर वाचलो पण बिचारी पुर्वी वाचु शकली नाही. मला सोडून द्या साहेब मी खरं सांगतोय" असं म्हणून अनिल रडत होता.

आता शेखरला त्याची दया आली. आणि पुर्वीबद्दलसुद्धा वाइट वाटत होतं. म्हणजे त्या रात्री शेखरला त्याच्या जवळ कोणी तरी आल्याचा भास झाला तो पुर्वीचा मारेकरि असावा. आपण थोड धैर्य दाखवलं असत तर कदाचित पुर्वीचा जिव वाचला असता असं शेखरला वाटत होतं. खरं काय ते सगळं त्यानं अनिलला सांगितलं आणि निश्चिन्त राहा असं म्हणून तो निघाला.

कोण कुठली ती पुर्वी ? काही काळासाठी सोबत राहिली आणि तिच्या आयुष्यातल्या अडचणीमधे मलाही वाहून गेली. पोलिसांचा तपास कोणत्या दिशेने असेल?? आपण जाऊन त्यांना खरी हकीकत सांगावी का?? असा विचार करत तो पुण्याला आला. एव्हाना संध्याकाळ उलटून गेली होती आणि दिवसभराचा ताण घेऊन शेखरसुद्धा दमला होता. म्हणून त्याने गाडीचं स्टेरिंग घराकडे वळवलं. घरी आल्यावर नेहमीप्रमाणे जेवण उरकून त्याने न्यूज़ लावली आणि पुन्हा एकदा ब्रेकिंग न्यूज़

" काल रात्री घडलेल्या खुनाचा खुलासा. कार्यक्षम पोलिसांनी एका दिवसात लावला खुनाचा छडा. प्रिय मैत्रिणीनेच केला खुनाचा कट. "

एवढीच बातमी ऐकून त्याने चैनल बदललं. सविस्तर बातमी तो दिवसभर ऐकून आला होता. पोलिसांबद्दल त्याला आता आदर वाटत होता आणि बाकी लोकांसारख पुर्वीला न्याय मिळायला उशीर झाला नाही हे पाहून त्याला हायसे वाटले. एक क्षण तो मुग्धा कडे पाहत होता की ही सगळी 2-3 दिवसांची गडबड मी कधी मुग्धाला सांगू शकेल का? की हे सगळं मला कायम गुपितच ठेवाव लागेल. पण हे गुपित माझ्या आयुष्यातलं सगळयात मोठं आणि थरारक आहे एवढं मात्र नक्की.

# नजरकैद

दवाखान्यात रोज काहीना काही नवीन पाहायला आणि ऐकायला मिळतं. प्रत्येकाच्या घरचे किस्से ऐकणे आणि अनिच्छेनेच का असेना पण त्यावर तोडगा काढणे हा जणू डॉक्टरचा दिनक्रमच झालेला असतो. श्रवणचाही दिनक्रम यापेक्षा काही वेगळा नव्हता पण समाजकार्याची खरंच आवड़ असल्यामुळे तो वेगळे काही करण्याचा विचारसुद्धा करू शकत नव्हता, कारण डॉक्टर हा असा पेशा आहे जिथे तुम्ही खऱ्या अर्थाने लोकांना मदत उपलब्ध करुन देऊ शकता. श्रवण या बाबतीत खुपच भावनिक होता. त्याच्यासाठी त्याचं काम हे फ़क्त काम नसून समाजासाठी काही तरी करण्याची धडपड होती आणि कमी वयातच त्याने ते साध्य केलं होतं. आज त्याचा स्वताःचा मोठा तीन मजली अगदी प्रशस्त आणि पॉश दवाखाना होता. दवाखान्याच्या एंट्रेन्सला वरती बोर्डावर मोठ्या अक्षरात लिहिलेलं होतं, " लाइफ केअर हॉस्पिटल" ईथे प्रत्येकाला परवडेल अश्या स्वरुपात सर्व रोगांचे निदान आणि उपचार शक्य होते. वेगवेगळया रोगांवर उपचार करणारे डॉक्टर्स, नर्स आणि कंपाऊंडर्सचा मोठा स्टाफ, प्रत्येक मजल्यावर चौकशीचे वेगळे कक्ष, एवढे डॉक्टर्स असूनही आपल्या हॉस्पिटलमधल्या प्रत्येक पेशंटकड़े तो स्वतः काळजीपूर्वक लक्ष द्यायचा.

आज तसं नेहमीपेक्षा वर्दळ कमीच होती दवाखान्यात प्रवेश केल्यावर वेटिंग रूममधे जत्रा भरल्याचा भास होई. पण आज मात्र अगदीच तुरळक लोक होते. त्यामुळे आल्या -आल्या त्याने रिसेप्शन वर चौकशी केली. तेव्हा कळलं आज बसेसचा संप असल्यामुळे जाण्या येण्याचा त्रास आहे. खरंच लोकांना पण काही कामं नसतात. छोट्या मोठ्या कारणांवरून संप करायचा

आणि सामान्य जनतेला त्रास द्यायचा. मुळात संप करुन मागण्या कुठे मान्य होतात का? असो आपलं काम आपण करायचं बाकी समाज बदलण्याची फक्त वाट पाहणेच आपल्या हातात आहे.

असा विचार करुन श्रवण हॉस्पिटलचा राउंड मारण्यासाठी केबिनच्या बाहेर पडला.

ICUच्या पेशंटला बघुन तो जनरल वार्डमधे आला आणि एकदम कसली तरी गडबड चालू असलेली त्याला दिसली कोण्यातरी कामगाराला चेंगरा चेंगरीमधे डोक्याला मार लागला होता वास्तविक सगळया हॉस्पिटलच्या नियमानुसार पोलिस आल्यावर उपचार करतात पण श्रवणच्या हॉस्पिटलचे नियम वेगळे होते आणि म्हणूनच त्या कामगाराला ईथे आणल होतं.

बाकी सगळं चेक अप करून त्याला ICUमधे ठेवण्यात आल आणि उर्वरित गोष्टीसाठी त्याने नातेवाईकांना केबिनमधे पाठवायला सांगितलं आणि तो केबिनमधे येऊन कॉफी घेत बसला.

थोड्याच वेळात केबिनच दार वाजलं आणि एक मुलगी आत आली. श्रवणचं नेहमीप्रमाणे रिपोर्टस वरच लक्ष होतं तो एकंदरित पेशंटची परिस्थिती समजवून सांगत होता आणि त्याने समोरच्या व्यक्तिकड़े न पाहताच तुम्ही पेशंटचे कोण असा प्रश्न केला

थोड्या वेळाच्या शांतते नंतर उत्तर आलं "कोणीच नाही"

आता मात्र श्रवणनी त्या व्यक्तिकड़े पाहिलं आणि त्याची नज़र तिच्या डोळयांवरच रोखली गेली. असं नव्हतं की एवढे सुंदर डोळे त्याने आजपर्यन्त पाहिलेच नव्हते पण अशी चमक कोणत्याच डोळयात त्याला जाणवली नव्हती. शुभ्र रंगाचा सलवार आणि त्यावर गुलाबी रंगाची ओढनी अगदी तिच्या गालांना मैचिंग अशी, आणि फिकट्ट गुलाबी लिपस्टिक आणि काजळ. मुळातच तिचे डोळे पाहणाऱ्याच्या हृदयाला भेदून जातील असे होते त्यात तिने ते लावलेले काजळ म्हणजे श्रवणचे घायाळ होणे निश्चित.

त्याला पुढे काय बोलावे तेच कळेना तो तिच्याकडे पाहतच राहिला. तिच्या त्या सुंदर डोळयांवरून त्याला नज़र हटवावी वाटेना. जणु तिच्या नज़रेनी त्याला कैद केलं होतं आणि तो त्या नज़रकैदेत अधिकच अड़कत गेला.

बराच वेळ शांत बसल्यावर श्रवण भानावर आला आणि मग तो तिची चौकशी करू लागला. तसं पहिलं तर हा त्याच्या नौकरिचा भाग होता. पण आता मात्र त्याला मनापासून तिच्याबद्दल माहिती हवी होती. आणि मग तिने बोलायला सुरुवात केली.

" डॉक्टर माझं नाव अवनी, मी मेडिकलची स्टुडेन्ट आहे आज संप होता. मला माहिती नव्हतं आणि म्हणून मी घराबाहेर पडले. कॉलेजवरुन परत येताना मला रस्त्यामधे हे गृहस्थ पडलेले दिसले. पण पोलिस चौकशीमुळे कोणी मदत करायला तयार नव्हतं, त्यांच्या जवळ त्यांच्याबद्दल माहिती मिळावी असं काही नव्हतं आणि पोलीसांना कळवण्याएवढा वेळ नव्हता म्हणून मी त्यांना इकडे आणलं. तुमच्या हॉस्पिटलबद्दल आमच्या कॉलेजमधे नेहमी सांगितलं जात की इथे पोलीस चौकशीपेक्षा माणसाच्या जिवाला जास्त महत्त्व दिलं जात आणि म्हणून... "

श्रवण खुप लक्षपूर्वक ऐकत होता आणि मग तो बोलायला लागला, " आणि म्हणून तुम्ही इथे आलात बर केलत आणि मला विशेष तुमच कौतुक कराव वाटत की तुम्ही डॉक्टर होण्या आधीच तुमच कर्तव्य पार पाडलत समाजाला खरंच अश्या डॉक्टरांची गरज आहे.

मला तुम्हाला एक विनंती करायची आहे जर तुमची हरकत नसेल तर??

तुम्हाला आमच्या हॉस्पिटलमधे काम करायला आवडेल का? म्हणजे तुमचा सरावसुद्धा होईल आणि आम्हाला एक चांगला डॉक्टरही मिळेल. मी अगदीच सहज विचारलं. म्हणजे पाहा, विचार करून उत्तर दिलं तरी चालेल"

अवनीला खरं तर हे अपेक्षितच नव्हतं मोठमोठ्या हॉस्पिटल्समधे बायोडाटा घेऊन गेलं तरी आपल्याला हवी ती नौकरी नाही मिळत आणि इथे स्वतः हून ही सुवर्ण संधि तिच्याकड़े चालत आली होती त्या संधिचे सोने करणे तिच्या हातात होते आणि ती निश्चितच ते करणार होती तिने आनंदाने होकार दिला.

श्रवणला आज खुप आनंद झाला होता कारण उद्या पासून अवनी दररोज हॉस्पिटलला येणार होती. तिला अजून जवळून जाणून घेण्याची संधी त्याला मिळणार होती. करियरकडे, समाजसेवेकडे एवढं लक्ष दिल्यावर स्वतः कडे पाहायला त्याला वेळच नव्हता. पण आज अवनीला पाहून त्याला स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची इच्छा होतं होती. खरंच मन खुप चंचल असत. कधी कोणाला पाहून मनात काय विचार येतील सांगता येत नाही.

कितीही प्रयत्न केला तरी भावनांना बांध घालता येत नाही. तसं पाहिलं तर अवनीला पाहताक्षणिच तिच्या सोबत उर्वरित आयुष्य घालवण्याची स्वप्ने त्याच्या मनानी त्याला दाखवायला सुरु केली होती. पण श्रवण समजदार होता त्याला जाणीव होती की एकतर्फी विचाराला काही मर्यादा असतात शिवाय अश्या नाजुक गोष्टीसाठी थोडा वेळ देने गरजेचे असते.

श्रवणनी ठरवलं की अवनीचं शिक्षण पूर्ण होईपर्यंत तिला त्याच्या भावनांबद्दल काहीही कळू द्यायचे नाही आणि रोज तो तिला भेटायचा सोबत वेळ घालवायचा. तिला तिच्या कामात आलेल्या अडचणी दूर करायला मदत करायचा. अवनी आल्यापासून हॉस्पिटललाही वेगळे रूप आले होते. पेशंट्सला ती असली की भीती वाटायची नाही. लहान मुलांना तर तिचा खुप लळा लागला होता. ती आली होती फक्त शिकण्यासाठी पण तिने श्रवणलाही खुप काही शिकवले श्रवणच्या आयुष्यात त्याच्या कामाव्यतिरिक्त अन्य कशालाही आजपर्यंत महत्त्व नव्हते पण आता मात्र ती जागा अवनीने घेतली आहे हे त्याला सतत जाणवत होते.

अवनीला आपल्या मनातलं कळु न देता तिच्या मनात आपलं काय स्थान आहे हे त्याला पाहायचे होते पण आजपर्यंत त्याला असं कुठेही जाणवलं नाही की तिच्या मनात त्याच्या विषयी आदरापेक्षाही आणखी काही आहे.

त्यामुळे त्याला सतत एक प्रकारची काळजी असायची आणि अवनीसुद्धा नेहमी म्हणायची की मी इथून गेल्यावर खुप काही करायचं ठरवलं आहे पण त्याला प्रश्न पडायचा की हिला कसं सांगू की मी तुला कायमचच इथ थांबवण्याचा विचार करत आहे.

श्रवण रोज ठरवायचा की आज अवनी सोबत कोणत्या गोष्टींबद्दल बोलायचं पण मुळात ती भेटल्यावर तो विचारात गुंतून राहायचा आणि मग फक्त तीच बोलत राहायची ह्यामुळे अवनीची अशी समजूत झाली की श्रवण कमी बोलतो. श्रवण सर्वसामान्य मुलासारखा नाही हे मात्र अवनीला पदोपदि जानवायचं. त्याचा शांत, समंजस, स्वभाव तो एक उत्तम सर्जन तर होताच पण त्या बरोबरच अतिशय दयाळु आणि प्रेमळ होता या हॉस्पिटलमधे आल्यापासून किती तरी गरीब लोकांच्या चेहऱ्यावर श्रवण नी केलेल्या आर्थिक मदतीमुळे आलेले हसु तिने पाहिले होते तिला कित्येकदा असे वाटे की श्रवणला तो करत असलेल्या कामाबद्दल काहीतरी कौतुकाचे शब्द बोलावे पण बाकी हॉस्पिटलच्या स्टाफने तिला सांगितलं होतं की श्रवणला एकांत प्रिय आहे आणि त्याला कामाव्यतिरिक्त बोलणे बिल्कुल आवडत नाही म्हणून अवनीसुद्धा शिक्षण सोडून त्याच्या सोबत इतर गोष्टींबद्दल क्वचितच बोलायची...

अवनी हॉस्पिटलमधे येऊन आता 2 वर्ष पूर्ण होतं आली होती. श्रवणची आणि तीची ओळख जरी एका अनोळखी व्यक्तिमुळे झालेली असली तरी आता मात्र श्रवण अवनीला, तिच्या घरातल्यांना, तिच्या आवडी निवडीना चांगलंचं ओळखत होता. पण अवनीला मात्र अजूनही श्रवणच्या बाबतीत तितकं काही माहिती नव्हतं किंबहुना तिने ते माहीत करून घेतलं नव्हतं.

आज अचानकच श्रवणला अवनीच्या नजरेतला बदल जाणवला आणि तो थोडासा दचकला कारण इतक्या दिवसात त्याने तिच्या डोळ्यातला हा भाव या आधी कधी पाहिलाच नव्हता. आज ती नेहमीपेक्षा जास्त आनंदी दिसत होती कारण विचारणं श्रवणला नकोसं वाटत होतं. त्याच्या मनाविरुद्ध काही घडलं नसेल ना याची त्याला भीती होती नको त्या शंका येत होत्या पण त्याला राहावतही नव्हतं आणि शेवटी विचार पक्का करुन त्यानं अवनीला विचारलंच,

" अवनी, आज खुप खुशीत दिसत आहेस आजपर्यंत तुला असं एवढं आनंदी पाहिल नाही, काही विशेष कारण आहे का?"

अवनीला हा प्रश्न खरं तर अनपेक्षितच होता. श्रवणचं आपल्याकडे एवढं बारीक लक्ष असेल असं तिला वाटलंच नव्हतं पण तरीही हसून तिने उत्तर दिलं " हो सर, कारण तर आहेच आनंदाच!! माझ्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळणार आहे, माझी ओळख बदलणार आहे "

श्रवणला काही कळलं नाही हे लक्षात आल्यावर तिने दीर्घ श्वास घेतला आणि सांगितलं,

" सर तुम्हाला आठवत का ?

मागच्या महिण्यात मी 4 दिवस रजेवर होते"

" हो, तू तुझ्या मावशीकड़े गेली होती ना? भावाच्या लग्नासाठी. " ते 4 दिवस श्रवणला 4 वर्षा सारखे वाटले होते, ते तो कसा विसरेन!

" सर, त्या लग्नात माझ्यासाठी आई वडिलांनी एक मुलगा पसंत केला होता, मयंक पटवर्धन त्याच नाव.. त्याच्या घरच्याना मी भेटले होते पण तो मुलगा काही लग्नाला नाही आला

पण नंतर दुसऱ्या दिवशी आम्ही भेटलो. तेव्हा मात्र मी हे सगळं गम्मतमधे घेतलं, तसं तर मस्करीमधे आलेल हे स्थळ आम्हाला खरंच आवडायला लागलं आणि काल आमच्या लग्नाची तारीख ठरली पुढच्याच आठवड्यात आहे! मयंकही डॉक्टर आहे. तो लंडनला स्थायिक आहे आणि मीसुद्धा लग्नानंतर तिकडेच जाणार आहे, तुम्हीही भेटा त्याला तुम्हालाही आवडेल तो "

आता मात्र श्रवणला अंधारी यायची बाकी होती. तो काय ऐकत होता, त्याच्या वर विश्वास ठेवावा की नको, की हे एक खुप वाइट स्वप्न आहे. त्याला काही कळेना आणि तो तिथून तसाच शांत निघुन गेला.

2 वर्षा पासून तो ज्या नजरकैदेत अडकला होता, आज मात्र त्याला खरं त्याचा दम घुटत असल्याचा भास होतं होता.

आज सकाळी श्रवण उठला तेव्हा त्याला दरदरून घाम आला होता. आज पहाटेच त्याने अवनीच्या लग्नाचे स्वप्न पाहिले होते आणि नकळत तो त्या अनोळखी असणाऱ्या मयंकचा हेवा करत होता. आजपर्यन्त पडलेल्या स्वप्नांमधलं हे सगळयात वाइट स्वप्न होतं. कसा तरी तो अंथरुणातून उठला. आज म्हणावा तसा ताजेपणा नव्हता. चहा घेऊनसुद्धा त्याला काही बरं वाटलं नाही.

खुप दिवसांनंतर आजारी असल्याचा भास त्याला होतं होता. आता हॉस्पिटलमधे जायलासुद्धा त्याला नको वाटत होतं. शेवटी त्याने फोन उचलला आणि हॉस्पिटलमधे फोन लावला आणि तो आज येत नसल्याच कळवून टाकलं.

आज बऱ्याच दिवसानी श्रवणला स्वताः सोबत वेळ घालवता आला होता आणि नक्कीच तो दिवसभर एका जागी बसून राहणार नव्हता. त्याने उठून स्वतःच आवरुन घेतलं. आज मुद्दाम त्याने घरातल्या नोकरांना सुट्टी दिली. त्याला आज पूर्ण एकांत हवा होता. नाश्ता बनवून त्याने टीवीचा रिमोट घेतला आणि टीवी चालू केला टीवी वर अक्षय कुमारचा भूलभुलैय्या चालू होता परत अवनीच! कंटाळून त्याने टीवी बंद केला आणि तो बालकनीमधे येऊन कॉफ़ी घेत बसला.

आज आभाळ आलं होतं तसच त्याच्या मनातसुद्धा विचारानी सगळा गोंधळ चालवला होता.

सलग 3 तास तो तसाच बालकनीमधे विचार करत बसला होता आणि हळू हळू सूर्य आभाळातून हळूच बाहेर डोकावत होता त्याला त्याची चूक कळायला लागली. अवनीला आजपर्यंत त्याने त्याच्या भावनांची पुसटशी कल्पना तरी द्यायला हवी होती आणि त्याने ठरवलं अवनीसोबत बोलायचं आणि तिचं जे उत्तर असेल त्याचा आदर करायचा...

काल दिवसभराच्या विश्रांतिनंतर आणि विचारांनंतर आता श्रवणला थोड़ बरं वाटत होतं तसा तो तयार होऊन चांगल्या मूडमधे हॉस्पिटलसाठी निघाला. ठरवल्याप्रमाणे सगळं व्हावं म्हणून तो मनात सगळया गोष्टींची उजळणी करत होता. काहीही झाले तरी त्यालाही संधी गमवायची नव्हती म्हणून तो ठरवत होता की अवनीला नेमकं कसं आणि काय सांगायचं...

" अवनी, मला माहिती आहे की तु मला फक्त एक मित्र म्हणून समजतेस पण माझ्या आयुष्यात तुझं येणं हे माझ्यासाठी खुप ख़ास आहे. तुला पहिल्यांदा पाहिलं आणि मी तुझ्यामधे अडकत गेलो. तुझ्या नज़रेनी मला असं कैद केलय की मला आता दुसरं काही दिसतच नाही ह्या डोळयांशिवाय.

इतके दिवस मी तुझ्या शिक्षणामुळे स्वतःला थांबवत आलोय पण आता मी तुझ्यापासून दूर नाही राहु शकत मला माहिती आहे की खुप उशीर लावला मी हे तुला सांगायला. पण अवनी खरंच, माझ्या एवढं प्रेम तुझ्यावर कोणीच नाही करत आणि करूही नाही शकत. मला तुझे स्वप्न पूर्ण करायचेत तुझ्या सोबत राहायचंयं मला तो अधिकार देशील अवनी?????

तुझं लग्न ठरलयं, सगळं व्यवस्थित चालु आहे, मला मान्य आहे हे सगळं आता बोलायची वेळ नाही पण मी खरंच तुला नाही गमवू शकत, उशीर केल्याची एवढी मोठी शिक्षा नक्कीच नसते, तुझ्या मनातही माझ्याबद्दल त्या भावना असतील तर या क्षणी आपण सर्व थांबवु, आपल्याबद्दल तुझ्या आई वडिलांना मी सांगेन नक्कीच ते आपल्याला अडवणार नाहीत "...

श्रवण आज आला खरा हॉस्पिटलमधे पण आल्यानंतर त्याच्या चेहऱ्यावरचा रंगच उडाला कारण आजपासून अवनीच्या सुट्या चालू होत्या. आज तिच्याकड़े हळदीचा कार्यक्रम होता. ती आता लग्ना नंतरच येणार होती बाकीची कामे पूर्ण करायला. लग्न झाल्यानंतरची श्रृंगारा नी पूर्ण अवनी!!! खरं तर हे पाहणं त्याचं स्वप्न होतं पण आज तसा विचार आला तरी त्याच्या अंगावर काटा आला आणि त्यानी मनाशी ठरवलं की आज नंतर ही गोष्ट कोणालाच आणि कधीही कळणार नाही की कधी तरी ह्या श्रवण नी अवनी वर खुप खुप प्रेम केलं होतं, तो तिच्यासाठी

काहीही करायला तयार होता, मी मान्य करेल की मयंक सोबत ती आनंदी राहील पण तीला माझ्या एवढं प्रेम निच्छितच त्याच्याकडून नाही मिळणार.

ठरवलं असत तर श्रवणनी आता तडक जाऊन अवनीला त्याच्या प्रेमाबद्दल सांगितलं असतं पण तो तिच्यासोबत तिच्या घरच्यांचाही विचार करत होता आणि जर अवनीच्या मनात त्याच्याबद्दल भावना नसेल तर एवढे सगळे व्यर्थच कदाचित तो हे सत्य स्वीकारु शकेल की त्याने उशीर केला पण अवनीचे त्याच्याबद्दलचे मत हे त्याच्या बाजूने नसेल तर हे सत्य पचवायला त्याला जड़ जाईल. म्हणून त्याने त्याच्या भावना मनात दडवुन ठेवल्या. पण राहून राहून त्याचं मन त्याला एकच गोष्ट सांगत होतं.

"तू सगळं मिळवलंस श्रवण पण तुझ प्रेम नाही मिळवू शकलास, खुप उशीर केलास सांगायला... "

आज अवनीच लग्न होऊन 6 वर्ष झाले असतील कशी असेल ती? काय चालू असेल तिच्या आयुष्यात? तिला माझी आठवण येत असेल का ?तिला माझं नाव लक्षात असेल का. ?..

श्रवणच्या डोक्यात विचार चालले होते पण त्या तंद्रितून त्याला फ़ोनच्या बेल नी जागं केलं. कोणी तरी त्याला भेटण्यासाठी आले होते हे सांगायला रिसेप्शन वरुन फ़ोन होता. त्याने त्या आलेल्या मंडळीना केबिनमधे बसवायला सांगितले आणि तो केबिनच्या दिशेने निघाला तेवढ्यात समोरून एक 5 वर्षाची छोटी मुलगी धावत येऊन त्याला धड़कली तसा त्याने खाली बसून तिच्या सोबत संवाद घालायचा प्रयत्न केला पण

पुन्हा तीच नजर आणि तो पुन्हा कैद झाला. त्याला विश्वासच बसला नाही. त्याच्या हृदयाचे ठोके वाढले त्याने त्या छोट्या मुलीला नाव विचारले आणि तिने गोड आवाजात सांगितलं

" श्रावणी मयंक पटवर्धन "

मयंक पटवर्धन?? हो तेच नाव. तेच डोळे. पण मग श्रावणी?? हो हेच नाव त्याने कित्येकदा स्वप्न रंगवताना त्याच्या आणि अवनीच्या मुलीचे असेल असे रंगवले होते (श्रवण+ अवनी = श्रावणी )आणि त्या नावाने त्याला त्याच्या सगळया प्रश्नांची उत्तरे मिळाली. त्याने श्रावणीला जवळ घेऊन घट्ट मीठी दिली आणि तसाच तो परत फिरला कारण त्याला आता अवनीच्या समोर जाणे शक्य नव्हते. पण परत फिरताना त्याच्या डोळयात अश्रु होते, ओठांवर हसु होतं, मनात पश्चाताप होता, भावनांचे ओझे घेऊन तो चालत होता खरा पण आज त्याला शांत झोप येणार होती कारण त्याला सतवणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला मिळाली होती त्याला नेहमी वाटायचं की अवनीला त्याची आठवण येत असेल का??पण आज अवनीने तिच्या मुलीच नाव श्रावणी ठेऊन नकळत त्याच्याबद्दलच्या भावनांना दुजोरा दिला होता. तू जिंकलस श्रवण फक्त ते मिळवू नाही शकलास...

## हमसफ़र

कार्तिक आज जरा टेंशनमधेच होता तीन दिवस झाले तो सलग इंटरव्यू घेत होता पण त्याला मनासारखां असिस्टेंट भेटत नव्हता. एवढ्या महत्त्वाच्या कामासाठी कोणातरी योग्य व्यक्तिचीच निवड करणे त्याला गरजेचे होते आणि म्हणून तो घाई करत नव्हता. खुप मोठी एडवरटाइजिंगची कंपनी होती. कार्तिकवर संपूर्ण दिल्लीच्या ऑफिसची जबाबदारी होती. निश्चित तो या कामासाठी योग्य होता. पण आज त्याला खुपच वैताग आला होता. सकाळ पासून तो वेगवेगळया व्यक्तींना भेटला होता. त्यांचे बोलणे ऐकले होते आणि आता त्याच्या संयमाचा बांध तुटण्याची वेळ येत होती. थोडा निवांत आणि ताजेपणा मिळावा म्हणून त्याने कॉफी मागवली आणि पुढच्या इंटरव्यूसाठी तयार झाला. आता तरी त्याने सगळया अपेक्षा बाजुलाच ठेवल्या होत्या. शेवटचा इंटरव्यू म्हणून तो थोडा कंटाळून गेला होता आणि दरवाजा उघडला तशी एक सुंदर मुलगी आतमधे आली. फॉर्मल ड्रेस त्याला साजेसा मेकअप. तिने तिचं नाव सांगितलं... समीरा

ती फक्त दिसायलाच सुंदर होती असं नव्हतं तिची बुद्धिमत्ताही तेवढीच प्रगल्भ होती आणि आजचा दिवस सार्थकी लागला म्हणून त्याने तिला तिची निवड झाली असे सांगितले. आता मात्र तो शांतपणे घरी जाऊ शकत होता. उद्या पासून त्याचा कामाचा व्यापही खुप वाढणार होता काय काय करायचे या विचारांचे चक्र त्याच्या डोक्यात चालू झाले आणि तो तसा घरी निघाला.

दुसऱ्या दिवशी आज खुप काम करायचे आहे असं गृहीत धरूनच तो ऑफिसला निघाला. सगळयांना त्यांची कामे सांगून तो आता समीराकडे वळाला. थोडासा वैतागलेलाच होता तो. कारण नवीन व्यक्ति म्हणजे पुन्हा सगळे पहिल्यापासून सांगा आणि कोठून सुरुवात

करावी ह्याचे उत्तर शोधत तो समीरापर्यन्त पोहोचला. तिला पाहून तो थोडासा अचंबित झाला. कारण जे काम तो तिला समजावून सांगण्यासाठी आला होता तेच काम ती सफाइदारपणे करताना दिसत होती. आणि आपली निवड योग्य असल्याचे समाधान घेऊन तो त्याच्या कामाकडे वळाला.

समीरा ऑफिसमधे येऊन आता 2 वर्ष झाले होते. तिच्या सोबत कार्तिकने खुप मोठी मोठी कामे घेतली आणि यशस्विरित्या पूर्णही केली. हे सर्व जरी कार्तिकच्या हुशार बेधडक व्यक्तिमत्त्वामुळे झालं असलं तरी समीराची साथ तो विसरु शकत नव्हता. वाटतं त्यापेक्षा किती तरी सहज हे यश त्याला तिच्या योग्य निर्णय क्षमता आणि जबाबदार पणा या गुणांमुळे मिळालं होतं आणि हा सगळा विचार करत असताना तिची साथ आपल्याला आयुष्यात ही मिळाली तर! असा विचार त्याच्या मनात डोकावून गेला.

पण आपण विवाहित आहोत हे तो समीराला पाहताना नेहमीच विसरून जायचा. आणि क्षणार्धात त्याचं मन भानावर आलं. स्मिता सोबतच्या त्याच्या लग्नाला संसार म्हणणे खरं तर योग्य नव्हते. पण ही तडजोड तो गेली 5 वर्षे करत होता.

स्मिता ही कार्तिकच्या मामाची मुलगी. कार्तिकचे वडील आणि त्याचे मामा यांच्यामधे घनिष्ट मैत्री होती आणि स्मिताच्या जन्मानंतर तर गमती गमतीमधे कार्तिकचे वडील तिला सुनबाई अशी हाक मारत. पण कार्तिक आणि स्मिता या दोघांमधील नातं मैत्री पलीकडे कधी गेलंच नाही. स्मिता मेडिकलला अमेरिकेला होती आणि तिथेच तिचं कोणावर तरी प्रेम होतं. पण शिक्षण अजून बाकी आहे म्हणून तिने घरी सांगितलं नव्हतं. पण अचानक एका अपघातामधे तिचे आई वडील दगावले. आणि तिच्या उर्वरित शिक्षणाची जबाबदारी कार्तिकच्या वडिलांनी घेतली. शेवटी उपकाराच्या ओझ्याखाली केवळ कार्तिकच्या वडिलांची इच्छा म्हणून तिने कार्तिक सोबत लग्न केले. बाकी त्यांच्यामधे जे मैत्री चं नातं होतं तेवढंच.

कार्तिकने तरी कधी कोणावर प्रेम केलं होतं. म्हणून तोही आई वडिलांच्या आनंदासाठी शांत राहिला. पण त्यांचं नातं कधी मैत्रीपलीकडे नाही जाऊ शकलं. इतके वर्ष त्याला

वेगळया अश्या प्रेमाची उणीव कधी भासली नव्हती. कारण प्रेम नावाच्या वादळाने त्याला या पूर्वी अशी धड़क दिली नव्हती. पण समीरा त्याच्या ऑफिसमधे एखाद्या वाऱ्याच्या झोतासारखी आली आणि कार्तिक तिच्यासोबत झाडावरून अलगद पडलेल्या एखाद्या पानासारखा वाहत गेला.

कार्तिकच्या आयुष्यात समीराची ठोस अशी एखादी जागा नसली तरी तिचं त्याच्या आयुष्यातील अस्तित्त्व देखील कुणी आता मिटवू शकणार नव्हतं. समीराही हळू हळू कार्तिकच्या गुणांमुळे आणि त्याच्या देखणेपणामुळे त्याच्या कडे खेचली जात होती कार्तिक थोडासा गव्हाळ रंगाचा पण उंच रुबाबदार आणि घरन्दाज होता. तो लहानपणापासून एखाद्या घरन्दाज आणि तालेवार कुटुंबामधे वाढला आहे हे त्याच्या रोजच्या वागणुकीतून कोणीही सांगेल आणि अनाथ असणारी समीरा या सगळया वातावरणात प्रेमात न पडेल तरच नवल.

एखाद्या सर्वसामान्य मुलीचे जसे स्वप्न असते तसेच समीराचेही होते. एक छोटसं पण टुमदार घर, सुखी कुटुंब, आपल्यावर जिवापाड प्रेम करणारा नवरा असं अगदी सुरेख स्वप्न ती लहानपणापासून पाहत होती. आणि कार्तिक कडे पाहून तिला सतत तिच्या या स्वप्नाची आठवण व्हायची. आणि अशातच त्या दोघांना कंपनीच्या कामासाठी शिमलाला जायचे होते त्या ठंडगार आणि नयनरम्य वातावरणात आपणच कार्तिकला आपल्या प्रेमाची गवाही द्यावी असं तिला क्षणभर वाटून गेलं आणि तिने ते मनाशी पक्क केलं. एक अनाथ असण्याचं दुःख सोडला तर तिला तिच्यामधे कमीपणाचं असं काहीही वाटत नव्हतं आणि म्हणून तिने एकदा कार्तिकला स्पष्ट बोलून दाखवाव असं ठरवलं.

शिमला येणे कार्तिकसाठी नवीन नव्हते. या आधीही तो 3- 4 वेळेस कंपनीच्या कामासाठी आला होता पण या वेळेस मात्र त्याला हे वातावरण खुपच सुंदर वाटत होते. सोबतीचा परिणाम एवढा सुंदर असु शकतो या वर त्याचा विश्वासच बसत नव्हता. कारच्या खिड़कीतून शिमला पाहताना समीरा हरवुनच गेली. समीरा पहिल्यांदाच शिमल्याला आली होती साहजिक हे दृश्य ती भरभरुन जगत होती आणि तिचं ते जगणं तिच्या बोलण्यातून कार्तिकलाही जगण्याचं

बळ देऊन गेलं. ती हिरवीगार झाडी त्यावर आच्छादलेले शुभ्र बर्फ, वातावरणातला तो ओलावा या सगळया गोष्टी जणु त्याने पहिल्यांदाच पाहिल्या होत्या असं त्याला आता वाटत होतं, तिच्या बोलण्यासोबतच तिच्या डोळयातले भाव त्याला सुखाच्या वेगळयाच सफरीवर घेऊन गेले. आणि क्षणभरासाठी डोक्यातले सगळे चक्र थांबवून तो फक्त तिच्याबरोबर होता शरीराने आणि संपूर्ण मनाने. हा विलक्षण अनुभव तो आयुष्यात प्रथमच घेत होता. या सगळयात तो मीटिंग आणि काम पूर्ण विसरून गेला.

आणि 10 वाजता त्याच्या फ़ोनमधे मेसेज आला की मीटिंग बरोबर 10. 30ला सुरु होईल तसा तो भानावर आला आणि त्याने ड्राईवरला गाडी मीटिंग असलेल्या ठिकाणाकडे वळवण्यास सांगितली. 10. 30ला चालु झालेली मीटिंग 2 वाजता संपली. समीराच्या सुंदर आणि अगदी रेखीव प्रेसेंटेशन सोबत मीटिंगची सांगता झाली. आजच काम यशस्वीरीत्या पार पडलं होतं. आणि याच आनंदात समीरा आणि कार्तिक लंचसाठी म्हणून एका सुंदर रेस्टोरेंटमधे आले होते. जेवण यायला उशीर होता आणि तोपर्यन्त समीरा तिच्या मनातले कार्तिक जवळ बोलून दाखवणार होती. पण समीरा काही बोलायच्या आतच कार्तिकने विषय सुरु केला.

" आजची मीटिंग खुपच छान पार पडली. समीरा, तुझे कौतुक करावे तेवढे कमी. प्रेसेंटेशन तर फारच सुरेख होते म्हणजे कामाच्या सगळया गोष्टी होत्या पण बोरिंग वाटले नाही. खुपच छान. "

या कौतुकाच्या वर्षावानंतर समीरा काहीशी लाजलीच

" काय हे कार्तिक, मला एकटीलाच देताय तुम्ही महत्त्व, तुमच्या मार्गदर्शनाशिवाय हे अगदीच अशक्य होतं. माझ्या यशामागे तुमचा वाटा खुप आहे. आणि म्हणूनच मला काही तरी सांगायचे होते. "

आता मात्र कार्तिक थोडस सावरून बसला आणि मग बोलायला लागला,

" मला माहिती आहे समीरा तुला काय बोलायचे आहे, किंबहुना मीच तुझ्यासोबत या संदर्भात बोलणार होतो पण खरं सांगू का सुरुवात कशी करावी तेच कळत नाहीये, आणि तुला हे सगळं सांगून तु त्यावर कशी व्यक्त होणार याचीच मला जास्त भीती आहे.

समीरा, मी विवाहित आहे खरं म्हणजे मी हे तुला आधीच सांगायला हवं होतं पण या विवाहाला काही अर्थच नाहियेे आणि म्हणून तो मी नेहमी विसरुन जातो. माझं लग्न म्हणजे घरच्यांसाठी केलेली तडजोड म्हण हवं तर. आम्ही जगासाठी नवरा बायको असलो तरी चार भिंतींमधे आमच्यामधे मैत्रीपलीकडे कोणतचं नातं नाही आणि ते निर्माण होण्याची शक्यताही नाही. मला कधी प्रेमाची व्याख्या नाही कळली म्हणून कधी गरजही नाही भासली पण ते म्हणतात ना तुम्ही जरी प्रेमाचा शोध नाही घेतला तरी प्रेम तुम्हाला शोधत येतचं. तुला पाहून पहिल्यांदा मला त्याची जाणीव झाली आणि हळूहळू मी तुझ्यामधे गुंतून गेलो. माझं तुझ्यावर प्रेम आहे हे जेवढं सत्य आहे तेवढच सत्य हेही आहे की माझ्या आयुष्यात मी तुला तुझं योग्य स्थान नाही देऊ शकत. "

हे ऐकताना कुठे तरी भूकंप होतं आहे, कुठे तरी समुद्र खवळला आहे असं समीराला वाटत होतं. आणि ती सुन्न झाली तेवढ्यात वेटरने जेवण आणून समोर ठेवले आणि नंतर एक शब्दही न बोलता दोघे जेवण करत होते. जेवण करुन ते लगेच निघाले. प्रवासात पण दोघे शांत होते. समीरा काही वेळाने निद्रेच्या स्वाधीन झाली.

कार्तिकला समीरासोबत बोलून आता 4 दिवस लोटले होते शिमल्यावरून परतल्यावर तिने 4 दिवसांची रजा टाकली होती. निमित्त मात्र आजाराचं. कार्तिक अजूनच घाबरला होता त्यादिवशी बिचारी किती खुश होती आपण उगाचच तिला नसतं टेंशन देऊन आजारी पडण्यास भाग पाडलं आता त्याला अधिकच अपराधी वाटत होतं.

इतक्यात त्याच्या मोबाइलच्या डिस्प्ले वर मेसेज झळकला. उद्या दुपारी लंचसाठी समीराचे आमंत्रण होते. काय बोलणार असेल समीरा?? अश्या वेळेस सामान्य प्रेमी होकार का

नकार या गुंत्यात अडकून असतात पण इथे कार्तिकने समीराला अशा कोडयामधे टाकले होते की त्याचे उत्तर शोधणे महाकठिण काम होते. आणि याची त्याला पुरेपूर जाणीव होती. आपले आयुष्य एखाद्या सिनेमातल्या सारखे साधे सरळ का नाही याचे त्याला दुःख होते. एक नायक नायिकाची जोडी, एखादा विलन, थोडे सहकलाकार, एक दोन विनोदवीर आणि थोड्याश्या ड्रामा नंतर गोड शेवट. खरंच किती साधे असते सगळे. आयुष्यातले असे पेच प्रसंग कसे सोडवावे याच्या शिकवण्याही नसतात कोठे. आणि विशेष म्हणजे हे असे जीवनातील कठीण निर्णय घेताना आपल्या जवळची माणसेच आपल्याला विरोधक म्हणून लाभतात हे केवढे मोठे दुर्भाग्य.

दुसऱ्या दिवशी दुपारी समीरा भेटली ती खुपच प्रसन्न चेहऱ्यासोबत. तिच्याकडे पाहून तिला या कोडयाचे उत्तर मिळाले असे वाटत होते. आज मात्र तिने जेवण्याआधी काही भावनिक न बोलणेच पसंत केले. जेवल्यानंतर एका शांत ठिकाणी बसून तिने बोलायला सुरुवात केली.

" कार्तिक, अहो किती विचित्र परिस्थितीमधे आपण अडकलो होतो याची जाणीव आहे का तुम्हाला?? तुमचं माझ्यावर आणि माझं तुमच्यावर प्रेम आहे हे असं एवढं साधं सोप्पं असून पण आपण एकत्र नाही येऊ शकत. तुमच्या आई - वडिलांचा आदर म्हणून तुम्ही अडकून आहात आणि तुमच्या हतबलतेमुळे मी. पण तुम्हाला खरं सांगू का लहानपणापासूनच मीही अशी अनाथ म्हणून वाढले त्यामुळे कोणतीच गोष्ट मला सहज म्हणून मिळाली नाही आणि आता पाहा ना हे प्रेम पण.

काही हरकत नाही, माघार म्हणून मी आयुष्यात घेतली नाही. मी मला हव्या असलेल्या आणि मी हकदार असलेल्या सर्व गोष्टी मी मिळवल्या आहेत. आणि तुम्हालाही मी मिळवणारच. तुमचंही माझ्यावर प्रेम आहे हीच माझ्यासाठी ताकतीची बाजू आहे. मी थांबायला तयार आहे, अगदी शेवटपर्यंत!!! कधी तरी परिस्थिती आपल्या बाजूने होईल तेव्हा एकत्र येऊ. "

कार्तिक तिच्याकडे सुन्न होऊन पहातच राहिला. तिला प्रश्नाचे उत्तर मिळाले हे दिसतच होते पण हे उत्तर मिळाले असेल असे त्याला स्वप्नातही वाटले नव्हते. त्याने हर प्रकारे

तिची समजूत घातली, येणाऱ्या कठोर प्रसंगांची जाणीव दिली पण समीरा ठाम होती आणि म्हणून कार्तिकनेही तिला शेवटपर्यन्त साथ देण्याचे मनोमन ठरवले.

आज 20 वर्षे उलटून गेली त्या घटनेला. मागे वळून पाहतांना कार्तिकला अनेक संकटे, त्यातून काढलेले मार्ग, समीराची खंबीर साथ, सुख- दुःखांमधला तिचा आधार सारे काही आठवत होते. आई वडील गेल्यानंतर त्याने स्मिताला घटस्फोट दिला. स्मितासुद्धा आनंदाने अमेरिकेला निघुन गेली आणि त्यानंतर कार्तिकने रितिनुसार समीरासोबत लग्न केले. आज बाल्कनीत उभं राहून, चंद्राच्या प्रकाशात आत बेडरूममधे निवांत झोपलेल्या समीराकडे पाहून कार्तिकला मंत्रमुग्ध झाल्यासारखे वाटत होते

" रूबरू तो होंगी मंजिले इक दिन

चाहे रास्तोंसे रहे तू बेख़बर

मुश्किलों की पर्वा छोड़कर जो साथ दे

बस ऐसा इक चुनना तू हमसफ़र"

काहीजण समजतात की फ़ुकट मिळणारी पुस्तके कमी दर्जाची असतात. हे पुस्तक वाचल्यावर अशा लोकांचा समज बदलेल. अनेक अतिशय चांगले तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. त्यांच्या कथा मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे,

ई साहित्य प्रतिष्ठान

ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणुक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान